जनसंपर्क कक्ष
24 APR 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी'चे उल्लेखनीय यश

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञानाच्या संधी खुल्या करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सन २०१२ मध्ये 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी'ची स्थापना करण्यात आली आहे. येथे बी. एस्सी., एम. एस्सी., एकात्मिक अभ्यासक्रम सुरू झाला आणि या अभ्यासक्रमाच्या पहिल्याच बॅचच्या मानसी हुपरीकर या विद्यार्थिनीला जर्मनीमध्ये संशोधनाची संधी मिळाली आहे, तर बी. एस्सी.मध्ये शिकणाऱ्या नीलम यादव या विद्यार्थिनीला ३० लाखांच्या शिष्यवृत्तीसह फ्रान्समध्ये पुढील उच्च शिक्षणाची संधी मिळाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञानाचे लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सन २०१२ मध्ये स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीची स्थापना करण्यात आली. या शाखेच्या पहिल्या बॅचची विद्यार्थिनी मानसी हुपरीकर सध्या एम. एस्सी. भाग-२ मध्ये शिकत आहे. तिला जर्मनीमधील मारबर्ग येथील जगप्रसिद्ध फिलिप्स विद्यापीठात इंटर्नशीप करण्याची संधी प्राप्त झाली आहे.



**कोल्हापूर : नीलम यादव, मानसी हुपरीकर यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्रा. पी. एस. पाटील.**

बी. एस्सी. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या नीलम यादव हिला फ्रान्समधील पॅरिस-सुड विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण प्राप्त करण्याची संधी मिळाली आहे. या विद्यार्थिनींना डॉ. पी. एस. पाटील, डॉ. के. के. शर्मा, आणि डॉ. शिवदत्त प्रभू यांचे मार्गदर्शन लाभले.

24 APR 2017 **Times of India** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Mock test conducted for NEET applicants

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** DKTE societys Textile and Engineering college conducted a mock test on CET and NEET on Sunday at its campus in Ichalkaranji.

**CAMPUS BUZZ**

"The mock test was been held to see what is required for a proper preparation for the final entrance exam,"a DKTE official said.

These mock entrance tests are most essential for engineering and medical aspirants.

"The test surely helps students to sharpen their skills and clear many doubts. It also helps them overcome the entrance examination phobia," said another DKTE official.



Two SUK students got scholarships to study in foreign universities

**Two SUK students get scholarships in foreign univ:** Two students from the School of Nano science and Technology of the Shivaji University, Kolhapur (SUK) have been selected for the research opportunities in the foreign countires.

According to the SUK circular, Maansi Huparikar the first batch student of the School of Nano science and Technology in 2012, has got an opportunity to go for research work in Germany b ased Phillips University. She is studying in her final year MSc course.

Meanwhile, Neelam Yadav, a third year BSc student has got an opportunity to reseah in France based Paris-Sud University.

Coordinator of the School of Nano science and Technology P S Patil, said, "These students will get the opportunity to work with the internationally renowned researchers."

24 APR 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन जगावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जीवनातील अडीअडचणींची चिंता न करता, भविष्यातील समस्येचा विचार न करता जीवनातील येणारा प्रत्येक क्षण आनंदाने जगावा. यासाठी शिवाजी विद्यापीठ आपणास नेहमीच सहकार्य करेल, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्येष्ठ नागरिकांच्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे हा स्नेहमेळावा झाला. यामध्ये सुमारे चारशे ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आपण आपले सर्व आयुष्य जगण्याच्या स्पर्धेत घालवितो. नोकरीमध्ये कष्ट करतो. त्यामुळे आयुष्यात अनेक छंदांना वेळ देऊ शकत नाही आणि अनेकदा आवडत्या गोष्टी करावयाच्या राहून जातात. निवृत्तीनंतर आपल्याकडे असलेल्या



**कोल्हापूर : ज्येष्ठ नागरिक स्नेहमेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत अन्य मान्यवर.**

मोकळ्या वेळेचे नियोजन केल्यास आपण अनेक चांगल्या गोष्टी करू शकतो. इतरांना आनंद देण्याबरोबरच स्वतःही त्याचा आनंद घेऊ शकतो. शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा आपल्यासाठी सदैव वेगवेगळ्या योजना घेऊन येत राहील. त्यांचाही आपण लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी कुलगुरूंनी केले.

या कार्यक्रमासाठी कुलगुरूंच्या मातोश्री नागरबाई शिंदे आणि त्यांच्या भगिनी डॉ. शकुंतला सोळंके यांची विशेष उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत व परिचय करून दिला. विभागाच्या प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास डॉ. य. ना. कदम, डॉ. मानसिंगराव जगताप, डॉ. शिवाजीराव हिलगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विभागाच्या वतीने कुलगुरूंच्या मातोश्रींचा आणि डॉ. य. ना. कदम यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

दिवसभर चाललेल्या या स्नेहमेळाव्यात गीते, भावगीते, शास्त्रीय गायन, नाट्यछटा इत्यादी विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा झाल्या. त्यांना सहभागी ज्येष्ठांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. विजयी स्पर्धकांना डॉ. सुमन बुवा यांच्या हस्ते पुस्तके भेट देण्यात आली. हेमा गंगातीर्थकर, प्रभाकर कुलकर्णी, आर. एस. कुलकर्णी, रजनी हिरळीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. विजय जाधव व मनीषा झेले यांनी सूत्रसंचालन केले. यशोधन बोकील यांनी आभार मानले.

24 APR 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आनंदी जगण्यासाठी विद्यापीठाचे सहकार्य

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : आजीवन अध्ययनतर्फे ज्येष्ठ नागरिकांचा स्नेहमेळावा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : जीवनातील अडीअडचणींची चिंता न करता, भविष्यातील समस्येचा विचार न करता जीवनातील येणारा प्रत्येक क्षण आनंदाने जगावा, यासाठी शिवाजी विद्यापीठ आपणास नेहमीच सहकार्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्येष्ठ नागरिकांच्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे हा स्नेहमेळावा झाला. सुमारे चारशे ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

डॉ. शिंदे म्हणाले, "आपण आपले सर्व आयुष्य जगण्याच्या स्पर्धेत घालवितो. नोकरीमध्ये कष्ट करतो. त्यामुळे आयुष्यात अनेक छंदांना वेळ देऊ शकत नाही आणि अनेकदा आवडत्या गोष्टी करावयाच्या राहून जातात. निवृत्तीनंतर आपल्याकडे असलेल्या मोकळ्या वेळेचे नियोजन केल्यास आपण अनेक चांगल्या गोष्टी करू शकतो. इतरांना आनंद देण्याबरोबरच स्वतःही त्याचा आनंद घेऊ शकतो.'' नागरबाई शिंदे व डॉ. शकुंतला सोळंके, डॉ. य. ना. कदम, डॉ. मानसिंगराव जगताप, डॉ. शिवाजीराव हिलगे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्नेहमेळाव्यात गीते, भावगीते, शास्त्रीय गायन, नाट्यछटा इत्यादी विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा झाल्या. त्यांना सहभागी ज्येष्ठांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. विजयी स्पर्धकांना पुस्तके भेट देण्यात आली. हेमा गंगातीर्थकर, प्रभाकर कुलकर्णी, आर. एस. कुलकर्णी, रजनी हिरळीकर, श्री. आळतेकर, श्री. भागवत यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा यांनी प्रास्ताविक केले. विजय जाधव व मनीषा झेले यांनी सूत्रसंचालन केले. यशोधन बोकील यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्येष्ठ नागरिकांच्या स्नेहमेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

> शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा आपल्यासाठी सदैव वेगवेगळ्या योजना घेऊन येत राहील. त्यांचाही आपण लाभ घ्यावा.
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 APR 2017 लोकमत

# अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षा आजपासून सुरु होणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे अभियांत्रिकी विद्याशाखेतील विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना आज, सोमवारपासून प्रारंभ होणार आहे. या अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे वितरण पूर्णपणे गोपनीय व नियंत्रित पद्धतीने (सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एसआरपीडी) द्वारे केले जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

विद्यापीठाच्या बी. ए., बी. कॉम., बीबीए, बीसीए अशा विविध अभ्यासक्रमांच्या २४ परीक्षांना २३ मार्चपासून प्रारंभ झाला. यानंतर अभियांत्रिकी विद्याशाखेतील सिव्हिल, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल, टेलिकम्युनिकेशन, प्रॉडक्शन, माहिती व तंत्रज्ञान अशा विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना आज, सोमवारपासून प्रारंभ होईल. यात पहिल्या टप्प्यात संबंधित अभ्यासक्रमाच्या पुनर्परीक्षार्थींची परीक्षा होणार आहे. नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षेची सुरुवात दि. २८ एप्रिलपासून होईल. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात तोंडी परीक्षेची सुरुवात करण्यात आली होती. या वर्षी अभियांत्रिकीच्या सर्व परीक्षांचे पेपर हे 'एसआरपीडी'द्वारे पाठविण्यात येणार आहेत. दुसऱ्या सत्रातील या परीक्षेसाठी ८५ हजार परीक्षार्थी असणार आहेत. या परीक्षांची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती संचालक काकडे यांनी दिली. (प्रतिनिधी)

## दृष्टिक्षेपात परीक्षा

- विविध १८ अभ्यासक्रम
- ८५ हजार परीक्षार्थी
- पहिल्या टप्प्यात पुनर्परीक्षार्थींची परीक्षा

24 APR 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shivaji University's PhD, MPhil application process to start today

Piyush.Bhusari@timesgroup.com

## ADMISSION GATEWAY

- Application forms will be available from **April 24 to May 20**
- Entrance examination date is yet to be announced
- **Application form fee–**
  - **₹850** for open category candidate
  - **₹600** for reserved category candidate
- Students can get in touch with **SUK** computer centre or they can write an e-mail to **mphilphd@unishivaji.ac.in**
- Students can also contact on **0231-2609096** numbers for technical assistance
- The Entrance Test will be of **100 marks** (50 questions of two marks each)
- **No negative marks** for incorrect answers



## SEAT AVAILABILITY

| For PhD | For MPhil |
|---|---|
| 500 seats | 100 seats |
| in 47 subjects | in 22 subjects |

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) on Sunday announced that application process for Phd and MPhil courses will begin from Monday.

A notification from the SUK registrar Vilas Nandavadekar said the application process will remain live on its website till May 20. "There are over 500 seats in 47 subjects for the PhD candidates, while over 100 seats in 22 subjects for MPhil candidates," read the notification.

It added that for details about the entrance test, online application forms, intake capacity, examination centers and regulations, candidates may visit the varsity's website www.unishivaji.ac.in.

According to Nandavadekar, the procedure for admission will be undertaken as per the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of MPhil/PhD Degrees) Regulations 2016.

He added that all admissions for MPhil and PhD programmes shall be through a Common Entrance Test conducted by the SUK. However, the schedule of the exam is yet to be finalised and will be updated accordingly.

"Application forms are available on http://online.shivajiuniversity.in. Candidates must fill the application form for entrance test through the online mode. The fee for entrance test of MPhil/PhD will be Rs 850 for an open category candidate and Rs 600 for reserved category candidate," said the official.

Online payment gateway facility has been provided for the payment of the fees. The candidates will have to take a print out of the filled online form and submit/send it to Shivaji University (Inward section) on or before May 25 2017.

The entrance test will be a qualifying test for admission to MPhil/PhD programme and will be of 100 marks (50 questions of two marks each with multiple choices). The qualifying marks for entrance test will be 50% marks. There will be no negative marking for incorrect answers.

"If students face any kind of technical errors they can contact the varsity's computer centre or the PG-BUTR section or write an e-mail to mphilphd@unishivaji.ac.in," added the circular from the official.

The circular added that students can contact on 0231-2609096 for technical assistance to fill the online application, or on 0231-2609139 for any other query.

It should be noted that the University Grants Commission (UGC) earlier in the month of July 2016 had tweaked its guidelines for allowing the guides from under-graduate (UG) colleges to offer guideship to the MPhil and PhD candidates. The changes in the guidelines have already been given a nod in the academic council.

Earlier, in 2015, the UGC had issued guidelines, which restricted external supervisors from offering guidance to a particular university's candidates. It had asked for guides from affiliated PG institutes only, and even the qualified guides from UG colleges were not allowed for the guideship. The UGCs guideline had resulted in decrease in the available PhD seats by almost 90% in the SUK for the academic year 2015-16.

24 APR 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'रुसा'कडून मदत : शिवाजी विद्यापीठात साकारले समावेशी शिक्षण संसाधन केंद्र

# दक्षिण महाराष्ट्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ

संतोष मिठारी • कोल्हापूर

ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑडिओ बुक्स, ब्रेल प्रिंटिंग, आदी अद्ययावत तंत्रज्ञानावरील साधने असणारे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र (रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुसिव्ह एज्युकेशन) शिवाजी विद्यापीठात सुरु झाले आहे. या केंद्रामुळे दक्षिण महाराष्ट्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षण घेण्याच्या प्रयत्नांना पाठबळ मिळणार आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत (रुसा) हे केंद्र साकारण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत सुमारे २५० दिव्यांग विद्यार्थी आहेत. त्यातील दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांसाठी 'ब्रेल लायब्ररी' विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात कार्यान्वित आहे. या ब्रेल लायब्ररीमध्ये जास्तीत जास्त अद्ययावत आणि अन्य दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आवश्यक साधने, सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाचे प्रयत्न सुरु होते. त्याला 'रुसा'ने १५ लाख रुपयांच्या निधीद्वारे आर्थिक मदतीचा हात दिला. त्यातून ग्रंथालयात समावेशी शिक्षण संशोधन केंद्र साकारले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारी साधने या केंद्रामध्ये उपलब्ध करून दिली आहेत. शालेय ते महाविद्यालयीन पातळीवरील दिव्यांग विद्यार्थ्यांना 'समावेश शिक्षण' केंद्राचे सदस्यत्व मोफत दिले जाणार आहे. त्यांना इंटरनेटचा वापर, संगणक हाताळण्याबाबत तज्ज्ञांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाणार आहे.

## या साधनांची उपलब्धता

या केंद्रामध्ये ब्रेल पुस्तके, स्क्रीन रिडिंग सॉफ्टवेअर असणारे संगणक, ब्रेल प्रिंटिंग, ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-डाटाबेसेस, ई-रिसोर्सेस, ऑडिओ बुक्स, वाय-फाय सुविधा, इंटरनेट, मॅग्निफायर, स्पेक्टॅकल्स, टेलिस्कोप, आदी साधने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. 'रुसा'ने महाराष्ट्रात शिवाजी विद्यापीठासह शिवाजी कॉलेज अकोला, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) येथे या स्वरुपातील केंद्र साकारले आहे, शिवाय या केंद्रातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणारे केंद्र मुंबईतील सेंट झेव्हियर्स कॉलेजमध्ये साकारले आहे.



शिवाजी विद्यापीठात साकारलेल्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्रामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत तंत्रज्ञानावरील साधने उपलब्ध आहेत.

## अभ्यासक्रमाचे 'ब्रेल लिपी'मध्ये रुपांतर

दिव्यांग (अंध, मूकबधिर, अस्थिव्यंगबाधित, गतिमंद) विद्यार्थ्यांसाठी हे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र उपयुक्त ठरणार असल्याचे विद्यापीठातील या केंद्राच्या समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, केंद्रात अद्ययावत तंत्रज्ञान असलेली साधने उपलब्ध करून दिली आहेत. अंध विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार त्यांना अभ्यासक्रम, टेक्स्ट बुक हे 'ब्रेल लिपी' मध्ये रुपांतरीत करुन देण्याची सुविधा याठिकाणी आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना संगणक वापरण्याचे प्रशिक्षण आणि त्यांना करिअरविषयक मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे.

## संगणक, इंटरनेट वापरता येईल

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात हे महत्त्वपूर्ण केंद्र साकारले आहे. याद्वारे या विद्यार्थ्यांना संशोधन व अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविण्याकरिता संगणक आणि इंटरनेट वापरता येईल, असे डॉ. एम. एस. वासवानी यांनी सांगितले. ते म्हणाले, या केंद्रातील अद्यावत साधनांमुळे विविध पुस्तके आणि संगणकाच्या पडद्यावरील माहिती थेटपणे ऐकता येईल.

24 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अर्जुन टाकळकर



## परीक्षा फीव्हर...

सध्या विद्यापीठ आणि कॉलेज परीक्षांचा माहौल सुरू आहे. त्यामुळे कॅम्पसमध्ये प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपावरून चर्चा, नोट्सच्या देवाणघेवाणीतून परस्परांना आधार दिला जात आहे. विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये परीक्षेसंदर्भात सामूहिक चर्चा आणि लॅपटॉपच्या आधारे माहिती संकलित करण्यात विद्यार्थी, विद्यार्थिनी मग्न आहेत. विद्यापीठातील लॉन, कट्टा सर्वत्र एक्झाम फीव्हर जाणवत आहे.